# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Tarun Bharat 12-02-2016**

# देशपांडे फौंडेशनतर्फे जीआयटीला दोन पुरस्कार

प्रतिनिधी
बेळगाव

देशपांडे फौंडेशन हुबळीतर्फे झालेल्या आंतरराष्ट्रीय युवा परिषदेत येथील जीआयटीच्या लीड सेलने दोन पुरस्कार पटकाविले. उत्कृष्ट सहयोगी महाविद्यालय आणि उत्कृष्ट वार्षिक उपक्रम असे हे दोन पुरस्कार देण्यात आले.

लीडच्या एकंदर उपक्रमांमध्ये उल्लेखनीय सहभाग तसेच लीड एक्सोडस १५ चे आयोजन, त्याची दखल घेऊन हे पुरस्कार देण्यात आले. नोबेल पुरस्कारप्राप्त प्रा. मोहमद युनुस आणि देशपांडे फौंडेशनचे चेअरमन गुरुराज देशपांडे यांच्या हस्ते प्रा. हर्षित बी. कुलकर्णी यांनी हे पुरस्कार स्वीकारले. प्रोडिया सिस्टमस्च्या चेअरमन आणि सीईओ तसेच पहिल्या महिला खासगी गिर्यारोहक डॉ. अनौशेष अन्सारी, इन्फोसीसचे संस्थापक चेअरमन नारायण मूर्ती, आंतरराष्ट्रीय खेळाडू मालती के. होल्ला तसेच ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता आदी मान्यवरांचा या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग होता.

कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, महाराष्ट्र या पाच राज्यांमधील २ हजारांहून अधिक महाविद्यालयांमधून जीआयटीला हा बहुमान मिळाला आहे.



बेळगाव : प्रा. मोहमद युनुस आणि गुरुराज देशपांडे यांच्याकडून पुरस्कार स्वीकारताना हर्षित बी. कुलकर्णी. व जीआयटीचा लीड समूह.

**Sakaal 12-02-2016**

# जीआयटी अ, जेएसएस विजयी

## प्रशांत दोड्डुण्णावर क्रिकेट : केतन, शशांक सामनावीर

स्थानिक क्रीडा वृत्त

सकाळ वृत्तसेवा

बेळगाव, ता. ११ : युनियन जिमखाना मैदानावर उज्ज्वल स्पोर्टस् क्लब आयोजित प्रशांत दोड्डण्णावर स्मृती चषक आंतरकॉलेज टी-२५ लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेत बुधवारी झालेल्या विविध सामन्यात जीआयटी कॉलेज अ, जेएसएस धारवाडने प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करीत विजय संपादन केला. विजयी संघाच्या केतन कोल्हापुरे, शशांक पाटील यांना सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

पहिल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना जीआयटी कॉलेजने २५ षटकांत ७ बाद १७४ धावा केल्या. त्यांच्या केतज कोल्हापुरेने ६५, तेजस पवारने ३० धावांचे योगदान दिले. जीएसएस कॉलेजतर्फे विनायक केसरकरने ३, शाहू काटकरने २ गडी बाद केले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना जीएसएस कॉलेजने २५ षटकांत सर्वबाद १६१ धावा केल्या. त्यांना १३ धावांनी पराभूत व्हावे लागले. त्यांच्या मंजुनाथ ए. एच. ने ७३ धावांचे योगदान दिले. जीआयटी अ तर्फे नोएल डिमेलोने ३, तेजस पवारने ३, केतज कोल्हापुरेने २ गडी बाद केले.

दुपारच्या दुसऱ्या सामन्यात जेएसएस कॉलेज धारवाडने प्रथम फलंदाजी करताना २५ षटकांत ७ बाद १६० धावा केल्या. त्यांच्या अभिषेकने ४६, सागर मुरगोडने ३९, शशांक पाटीलने ३० धावांचे योगदान दिले. शेख कॉलेजतर्फे राहुल बजंत्रीने २, विनायक मेत्री, विठ्ठल कुरबेटने प्रत्येकी १ गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना शेख कॉलेजने २५ षटकांत ७ बाद १३६ धावा केल्या व त्यांना २४ धावांनी पराभूत व्हावे लागले. त्यांच्या राहुल बजंत्रीने ६२, एच. मुजावरने २८ धावांचे योगदान दिले. जेएसएस कॉलेजतर्फे शशांक पाटीलने ३, राहुल वेर्णेकरने २ गडी बाद केले.